म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा·वा
दा. क्र. २९९३

# स्वाध्यायमा

(पवित्र-धारा)

सोनाळकर

IRBK-0102993
IRBK-0102993

म. ग्रं. सं. ठाणें

# पवित्र पाणी

लेखक

व. त्र्यं. सोनाळकर

मध्यम विभाग




१६५

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २

2003



# पवित्र पाणी

(काल्पनिक गोष्ट)

— लेखक —

श्री. व. त्र्यं. सोनाळकर,
बी. ए., एलएल्. बी.,
अमळनेर

2003
IRBK-0102993

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे

संच ८ वा | पुष्प १६५ वें

१९४९ ] | [ किं. ६ आणे

आवृत्ति पहिली

सर्वाधिकार स्वरक्षित



# पवित्र पाणी

## संपादकीय

आपण आजपर्यंत गंगा नदीचें पाणी पवित्रतम व सर्वपापहारक समजत होतों व अजूनहि समजतों. तथापि, या जगांत गंगेच्या पाण्याहूनहि पवित्र असें पाणी आहे, आणि तें म्हणजे श्रमाच्या घामाचें पाणी ! जो मनुष्य कांहींहि श्रम न करतां जीवन कंठतो त्याला वैभव कधींहि प्राप्त होत नाहीं. " उद्योगिनं पुरुषसिंह-मुपैति लक्ष्मी " हें सुप्रसिद्ध वचन सर्वांच्या परिचयाचें आहे. तेंच एका सुंदर गोष्टीच्या द्वारें अमळनेर येथील वकील श्री. व. त्र्यं. सोनाळकर यांनीं मनावर बिंबविलें आहे.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) सुसंस्कृत नागरिकाला आवश्यक असें ज्ञान या पुस्तकांच्या वाचनानें मिळतें.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयास पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें व शिक्षण या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यासाठीं.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं देण्यासाठीं, शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

(१) सुसंस्कृत नागरिकांस असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.); राजकारणांतील चालू प्रश्न (मजूरपक्ष, घटना समिति इ.); थोर पूर्वजांचीं चरित्रें, निर-निराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास— यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

(२) शाळेंत स्थूल मानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

(३) मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरवसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

**किंमत–पुष्प १६१ पासून प्रत्येक पुष्पाची किंमत सहा आणे आहे.**

मुद्रक व प्रकाशक–**वि. गं. केतकर**, लोकसंग्रह छापखाना, ६२४, सदाशिव, पुणें २.



# पवित्र पाणी

ले- व. त्र्यं. सोनाळकर

फार प्राचीन काळींहि नव्हे आणि अगदीं अलीकडेहि नव्हे अशा काळांत एक अतिशय श्रीमंत सावकार बोधपुरांत रहात असे. त्याला सावकार म्हणण्यापेक्षां एक लहानसा राजाच म्हणणं जास्त शोभण्यासारखं होतं, कारण बोधपुराच्या आजूबाजूच्या वीस पंचवीस गांवांच्या बहुतेक जमिनी त्याच्या मालकीच्या होत्या. शिवाय तो रहात असे पण एखाद्या राजासारखा. त्याचा वाडा राजवाड्यासारखा भव्य होता. त्याच्या दिमतीला इतके नोकर चाकर होते कीं त्यांचा त्याला तरी पत्ता होता कीं नाहीं राम जाणें! राजाप्रमाणं त्याच्याजवळ असंख्य घोडे होते. त्याच्या जमिनीची व्यवस्था पहावयाला, पैसे गोळा करायला, जमिनींचं संरक्षण करायला लहान मोठे अधिकारी होते. त्यांचीं कामं निरनिराळ्या कचेऱ्यांतून चालत. वर्षांतून एकदा सर्व गांवचे वरिष्ठ अधिकारी बोधपुरांत जमत असत. त्याला दरबार भरवणं असं संबोधलं जाई. एकूण काय, तो एक लहानशा राज्याचा

राजा होता असं समजण्याला कांहीं हरकत नव्हती. राजेपणा पूर्ण व्हायला एकाच गोष्टींची उणीव होती. ती गोष्ट म्हणजे सैन्य. त्याच्याजवळ उभं सैन्य मात्र नव्हतं

श्रीमंत माणसाला जास्त श्रीमंत होण्याची साहजिकच इच्छा होते. त्याचप्रमाणं याहि सावकाराला आपण आणखी श्रीमंत व्हावं, आणखी जास्त गांवांच्या जमिनी आपल्या मालकीच्या व्हाव्या अशी इच्छा होती.

या सावकाराचं नांव होतं लक्ष्मीदास; परंतु त्याला सर्व लोक 'श्रीमंत' या नांवानं ओळखीत. आणि लक्ष्मीदास सावकाराला पण 'श्रीमंत' या नांवानं संबोधून घेणं मोठं प्रिय होतं.

श्रीमंतांच्या श्रीमंतीची खरी कल्पना कोणालाच नव्हती. लोक म्हणत ती आकाशासारखी अफाट आहे. खुद्द श्रीमंतांना देखील आपल्या श्रीमंतीची खरी कल्पना नाहीं अशी एक कल्पना सर्व लोकांच्यामध्यें पसरली होती.

श्रीमंतांच्या सर्वच जमिनी कमीअधिक सुपीक होत्या. फक्त एकच जमीन अगदीं नापीक अशी होती. पण ती केवढी मोठी ! एका टोंकाला उभं राहिलं तर दुसऱ्या टोंकाला दृष्टि पुरत नसे ! आजूबाजूला सुपीक जमिनी असून ही एकच जमीन अगदीं नापीक कां असावी हें लोकांना मोठं कोडं होतं—आणि नापीक म्हणजे किती ! त्याला कांहीं सीमा ? गवताची काडी नसे उगवत सबंध जमिनींत !

या जमिनीबद्दल लोकांना कोडं पडलं होतं असं जे वर सांगितलं तें कोडं जवळपासच्या लोकांना मात्र कधींच वाटलं नाहीं. दूरच्या लोकांना कोडं वाटे—त्या जमिनी जवळपासच्या सर्व गांवांतील लोकांना ती जमीन नापीक कां होती हें माहीत होतं. त्या

टापूंतले म्हातारे सांगत–ती जमीन एका कुळाची होती. फार वर्षां-पूर्वी म्हणजे हल्लींच्या श्रीमंतांच्या पणजोबांच्या काळामध्यें त्या जमिनीची मालकी दुसऱ्याकडे होती. त्यांना कांहीं पैशाची जरुरी लागली, म्हणून त्यांनीं ती जमीन हल्लींच्या श्रीमंतांच्या पणजोबां-कडे गहाण टाकली व कर्ज काढून पैसे उभे केले. त्यानंतर ज्या वेळीं जमिनीचा मालक पैशाची फेड करण्याकरतां त्यांच्याकडे गला तेव्हां त्याला श्रीमंतांनीं सांगितलं कीं जमीन खरेदी करून घेण्यांत आली आहे. त्या कुळानं त्या वेळच्या श्रीमंतांची खूप मनधरणी केली; पण श्रीमंत कांहीं ऐकेनात. श्रीमंतांचे त्यांनीं पाय धरले–पण कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांनीं खूप प्रयत्न केले–रडला–पण श्रीमंतांचं हृदय द्रवलं नाहीं. शेवटीं संतापून तळतळून तो म्हणाला, ‘श्रीमंत, तुम्ही आमच्या तोंडचा घांस लबाडीनं काढला आहे. त्या जमिनींतला घांस कांहीं तुमच्या तोंडांत पडणार नाहीं.’ तो शेतकरी संतापानें तेथून उठला. त्यानं त्या शेतांतलं सर्व उभ पीक जाळून टाकलं आणि आपण पण त्यांतच जळून मेला त्या दिवसा-पासून त्या जमिनींत कोणीं पीक पाहिलं नाहीं कीं हिरव्या गवताची काडी उगवलेली पाहिली नाहीं.

त्या दिवशीं श्रीमंत लक्ष्मीदास आपल्या चार घोड्यांच्या मोठ्या गाडींतून आपल्या वाड्याकडे चालले होते. त्यांची गाडी त्या नापीक जमिनीच्या बाजूच्या रस्त्यानं चालली होती त्या नापीक जमिनीकडे लक्ष जातांच त्यांना वाईट वाटलं–त्या जळून मेलेल्या कुळाकरतां नव्हे–एवढी मोठी जमीन अशी नापीक पडून आपलं कितीतरी नुकसान होत आहे याबद्दल! त्या शाप देणाऱ्या कुळाचा त्यांना खरोखर मोठा राग आला.

त्या रात्रीं श्रीमंत पलंगावर झोंपले होते. एकाएकीं त्यांना जाग

आली. स्वप्नांत त्यांना साक्षात्कार झाला होता. त्यांना स्वप्नांत एक देवदूत दिसला. श्रीमंत आपल्या चार घोड्यांच्या बग्गीमधून चालले असतांना तो देवदूत त्यांच्या गाडीला आडवा झाला आणि म्हणाला, 'वेड्या माणसा, असली असली सोन्यासारखी जमीन तूं वायां कां घालवितो आहेस?'

'देवा, मग मी काय करूं म्हणजे ही जमीन पुन्हा उपयोगांत येईल ?'



'ती जमीन जर जगांतल्या अत्यंत पवित्र पाण्यानें धुतली गेली तर यांतून सोनं निघेल.'

'देवा, कुठं आहे असं पवित्र पाणी !' श्रीमंतांनीं अधिरतेनं विचारलं.

पण देवदूताला उत्तर द्यायला वेळ मिळाला नाहीं, कारण श्रीमंत एकाएकीं जागे झाले.

ते स्वतःवर इतके कांहीं संतापले—देवदूताचं उत्तर ऐकायला ते उत्सुक झाले होते. पण आतां उपाय नव्हता.

एकाएकीं जाग कां आली हें त्यांच्या आतां लक्षांत आलं. ते घामाघूम झाले होते. त्यांना वारा घालणारा चाकर दमून पलंगा-जवळच झोंपलेला दिसला, त्याबरोबर त्यांनीं रागानं उठून त्या चाकराला अशी जोराची लाथ मारली कीं त्यामुळं त्यांच्या पायांतून पण जोराची कळ निघाली. तो चाकर पण घाबरून उभा राहून यंत्रासारखा पुन्हां वारा घालूं लागला. पण श्रीमंतांना पुन्हां कांहीं झोप लागली नाहीं. ते तळमळत पवित्र पाणी कोणतं असावं म्हणून विचार करीत पडले.

दुसरे दिवशीं सकाळींच त्यांनीं दिवाणजींना बोलावून पंचक्रोशींतल्या सर्व नामांकित विद्वानांची सभा बोलावण्याचा हुकूम दिला. ‘ दिवाणजी, झाडून सारे विद्वान् त्या सभेला येतील याबद्दल तुम्ही स्वतः काळजी घ्या. मला त्यांना एक प्रश्न विचारा-वयाचा आहे. त्या प्रश्नाचं उत्तर जो बरोबर देईल त्याचा मोठा सन्मान करायचं ठरवलं आहे आम्हीं. ’

श्रीमंतांचा हुकूम व्हावयाचा अवकाश, दिवाणजींची धावपळ सुरू झाली. गांवोगांवीं माणसें गेलीं. नामांकित विद्वानांना आमंत्रणें गेलीं.

ठरलेल्या दिवशीं श्रीमंतांच्या ‘ दरबारामध्यें ’ सर्व विद्वान् जमले. कोणाहि विद्वानाला आपणांला कां बोलावलं आहे याची कल्पना नव्हती. पण ज्या अर्थीं श्रीमंतांनीं तशी इच्छा दर्शविली त्या अर्थीं त्यांच्या इच्छेला मान देणं जरूर होतं. सर्व विद्वान् जमल्यानंतर दिवाणजींनीं श्रीमंतांना वर्दी दिली. श्रीमंत बाहेर आले. त्यांना सर्व विद्वानांनीं उत्थापन दिलं. श्रीमंत स्वतः त्यांच्यासाठीं खास तयार

केलेल्या उच्चासनावर बसल्यावर त्यांनीं सर्वांना बसायला सांगितलं. सर्व मंडळी बसल्यावर ते म्हणाले, 'तुम्ही सर्व आमच्या आमंत्रणा-प्रमाणं आलांत याबद्दल आम्हांला फार आनंद झाला तुम्हांला आम्हीं कां बोलावलं आहे याबद्दल तुम्हांला कांहीं कल्पना नाहीं. आम्ही तुम्हां सर्वांच्या पुढं एक प्रश्न टाकणार आहों. त्या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर देईल त्याचा मोठा सन्मान करण्याचा आमचा मानस आहे. आमचा प्रश्न दिसावयाला कठीण नाहीं पण अगदीं सोपा पण नाहीं.'

सर्व विद्वान् श्रीमंतांचा प्रश्न ऐकायला अगदीं उत्सुक झाले होते. एवढा कसला महत्त्वाचा प्रश्न आहे कीं श्रीमंतांनीं सर्व विद्वा-नांना आमंत्रण करावें !

श्रीमंतांनीं सर्व सभेवर दृष्टिक्षेप टाकून आपला प्रश्न विद्वानांच्या पुढें मांडला.

तो प्रश्न असा होता—' या जगांत अत्यंत पवित्र पाणी कोणतं आहे ? '

सर्व विद्वानांना श्रीमंतांचा तो प्रश्न ऐकून आपला अपमान झाल्यासारखं वाटलं. त्यांना वाटलं—एवढ्या साध्या प्रश्नाचं उत्तर द्यायला आमच्यासारखे विद्वान् कशाला पाहिजेत ? श्रीमंत आपली चेष्टा तर करीत नाहींत ना ?

सर्व विद्वान् गप्प बसलेले पाहून श्रीमंत म्हणाले, ' आमचा प्रश्न दिसायला अतिशय सोपा दिसत असला तरी तुम्हांला नीट विचार केल्यावर कळून येईल कीं दिसतो आहे तेवढा तो सोपा नाहीं. आणि मला वाटतं, त्या प्रश्नावर तुमच्या सर्व विद्वानांचं एकमतहि होणार नाहीं. काय वरुणशास्त्री, तुमचं काय उत्तर आहे आमच्या प्रश्नाला ?

वरुणशास्त्री आपलं पागोटं सांवरीत उभे राहिले व म्हणाले, ' श्रीमंत, माझ्या मतें पर्जन्याचं पाणी अतिशय शुद्ध म्हणून अतिशय पवित्र आहे. '

' गंगाधरशास्त्री, तुमचं काय मत पडतं ? ' श्रीमंतांनीं गंगाधर-शास्त्र्यांकडे पहात म्हटलें.

' श्रीमंत, गंगामाईच्या पवित्र पाण्यापेक्षां पवित्र पाणी या जगांत दुसरं असूं शकेल काय ? ज्या पाण्याच्या स्पर्शानं जगांतलीं सर्व पापें धुऊन निघतात त्या गंगामाईच्या परम पवित्र पाण्यापेक्षां इतर काय पवित्र असूं शकेल ? '

' वरुणशास्त्री, गंगाधरशास्त्री काय म्हणतात तें ऐकलं का ? ' श्रीमंतांनीं प्रश्न टाकला.

' ऐकलं श्रीमंत. पण मला त्यांच्या म्हणण्यांत फारसं तथ्य वाटत नाहीं. पाऊस पडला नाहीं तर गंगामाई तरी काय करणार ? आणि श्रीमंत, सर्व लोकांचीं पापं धुऊन आत्मसात् केल्यानं ती स्वतः अपवित्र नाहीं का होणार ? ' वरुणशास्त्री म्हणाले.

त्यांचं उत्तर ऐकतांच गंगाधरशास्त्री म्हणाले, 'शिव शिव ! काय बोलतां वरुणशास्त्री तुम्ही हें ? गंगामाई अपवित्र—मग जगांत पवित्र काय राहिलं ? '

' श्रीमंत, मी आपल्या प्रश्नाचं उत्तर देऊं का ? '

' जरुर, जरुर. तुमच्या सारख्या शूर विद्वानाचं उत्तरहि मला ऐकायचं आहे. '

'श्रीमंत, या जगांत रक्तासारखं पवित्र कांहीं नाहीं. मानवी रक्त—'

शूरसेनशास्त्र्याचं तें उत्तर ऐकून सर्व विद्वानांच्या अंगावर कांटे उभे राहिले. कोणाला काय बोलावं हें कळेना. शेवटीं कविराज

आनावर आले आणि म्हणाले, ' श्रीमंत, रक्त पवित्र असेल; पण तें शरीरांत धांवत आहे तोंपर्यंतच. शरीराच्या बाहेर आलेलं रक्त—अपवित्र. या अवनीतलावर मानवाच्या रक्ताइतकं अपवित्र काय असूं शकेल ? '

' भेकड आणि भित्र्या लोकांना तसं वाटणं साहजिकच आहे. रक्तपात—पवित्र कार्याकरतां झालेला रक्तपात—धर्माकरतां झालेला रक्तपात—देशाकरतां झालेला रक्तपात—अशा पवित्र कार्याकरतां सांडलेलं रक्त-त्या रक्ताला या जगांत दुसरी तोड नाहीं. '

' श्रीमंत ' कविराज मध्येंच म्हणाले, ' या तरवारबहाद्दरांना रक्तपातांत स्वर्ग दिसतो. पण या जगाचं स्मशान करायला कारण होतात हे लोक आपल्या वेडगळ कल्पनांनीं. ' श्रीमंत, माझं उत्तर आपण कृपा करून ऐकून घ्या.

' वा कविराज. आपलं उत्तरहि जरूर ऐकूं आम्ही. आम्हांला सर्वांचीं उत्तरं पाहिजे आहेत. काय कविराज, काय आहे आपलं उत्तर ? '

' श्रीमंत, या जगांत अश्रूंसारखं पवित्र काय असूं शकेल ? जगांतल्या सर्व पवित्र भावनांचा शेवट अश्रूंत होतो. पर्जन्याचं पाणी पवित्र असेल, गंगाधरशास्त्री म्हणतात तसं गंगामाईचं पाणी देखील पवित्र असेल—परंतु पर्जन्याचं पाणी धरणीला लागतांच आपली पवित्रता सोडून देतं—गंगामाईचं पाणी अश्रद्धावानाला पवित्र नाहीं—परंतु अश्रु ! अश्रु आणि अपवित्रता या दोन गोष्टी कदापि एकत्र येणं शक्य नाहीं. अपवित्रतेच्या अंतापासून अश्रूंचा उगम आहे—त्या अश्रूंपरतें पवित्र या जगांत काय असूं शकेल ? '

' विद्वानांनो, तुमचं एकमत होणं मला अशक्य दिसतं आहे.

एकंदरीनं पाहातां या विद्वानांच्या सभेंत मला कांहीं वरुणशास्त्र्यां-च्या मताचे लोक दिसत आहेत. कांहीं लोक गंगाधरशास्त्र्यांच्या मताचे दिसतात. रक्ताला पवित्र समजणारे क्षत्रिय वृत्तीचे विद्वानहि आमच्यासमोर बसले आहेत. कविराज, आपल्या मताचे लोकहि आपल्याभोंवतीं जमलेले आहेत. परंतु तुमच्या कोणाच्याच उत्तरानं आमचं समाधान झालेलं नाहीं. उलट आम्ही संशयाच्या चक्रांत सांपडलों आहों. आम्ही तुम्हां सर्वांच्या मनांचा विचार करूं आणि जरूर लागेल तर आम्ही आपणांपैकीं कोणाला तरी आमंत्रण करूं. दिवाणजी, या सर्व विद्वान् मंडळींची योग्य ती संभावना करा.'

एवढं म्हणून श्रीमंत आपल्या आसनावरून उठले व आंतल्या बाजूला चालूं लागले. सर्व विद्वानांनीं श्रीमंतांना उत्थापन देऊन त्यांना मान दिला.

रात्रभर श्रीमंत विचार करीत होते. बऱ्याच विचारानंतर त्यांना गंगाधरशास्त्र्यांचंच उत्तर बरोबर आहे असं वाटूं लागलं. सकाळ होतांच त्यांनीं दिवाणजींना बोलावून गंगाधरशास्त्र्यांना आमंत्रण पाठविण्याची आज्ञा दिली. आज्ञेप्रमाणं ते श्रीमंतांच्या समोर येऊन उभे राहिले व अदबीनं म्हणाले, 'काय आज्ञा आहे श्रीमंतांची?' श्रीमंत म्हणाले, 'शास्त्रीबुवा, कालच्या सभेंतील विद्वानांच्या उत्तरां-चा आम्हीं विचार केला. आम्हांला तुमचं उत्तर जास्त बरोबर वाटतं.'

'श्रीमंतांची विद्वता मशहूर आहे. विद्वत्तेचं आकलन होण्याकरितां देखील विद्वत्तेची जरुरी लागते.'

'पण शास्त्रीबुवा, तुमचं उत्तर बरोबर आहे असं आम्हांला जरी वाटत असलं तरी तें बरोबरच आहे हें ठरवणारा काल अजून पुढं आहे.' श्रीमंतांचे ते उद्गार ऐकून शास्त्रीबुवा घोटाळ्यांत पडले.

श्रीमंत पुढें म्हणाले, 'हे पहा, आम्हीं काल सर्व विद्वानांना

तो प्रश्न कां विचारला तें तुम्हांला सांगतों. आमची ती पडित जमीन तुम्हांला माहीत आहेच. आज वर्षानुवर्षे ती पडून आहे. कारण त्यांत गवताची काडी देखील उगवलेली कोणीं पाहिली नाहीं. परवां रात्रीं साक्षात्कार झाला. स्वप्नांत एक देवदूत आमच्या गाडी-समोर आडवा झाला व त्यानें आम्हांला संदेश दिला कीं, ' जगां-तल्या अत्यंत पवित्र पाण्यानं ती जमीन धुतली गेली तर त्यांतून सोनं निघेल. '

'श्रीमंत, मग माझ्या उत्तराची प्रचीति पहाच आपण. ती जमीन शापित आहे. गंगामाईच्या पवित्र पाण्यानं ती जमीन जर धुतली गेली तर ती जमीन शापमुक्त होईल आणि तींतून खरोखरच सोनं निघेल. '

' मग असं करा. तुम्ही तें काम अंगावर घ्या. नीट चांगला मुहूर्त शोधून काढा. वाटेल तेवढीं माणसं घ्या, आणि गंगामाईच्या पवित्र पाण्याच्या हजारों कावडी आणून ती जमीन धुऊन काढा. दिवाणजींना आम्ही पैशाबद्दल आज्ञा करतों. त्याची काळजी करूं नका. आपल्या कामाला लागा. '

श्रीमंतांचा शब्द होता. श्रीमंतांचा पैसा होता. गंगाधरशास्त्र्यांनीं चांगला मुहूर्त पाहिला. आपल्या कार्याला यश यावं म्हणून होम-हवन केलं. मोठ्या समारंभानं चांगल्या मुहूर्तावर हजारों माणसं घेऊन शास्त्रीबुवा गंगामाईच्या पवित्र कावडी आणण्याकरतां जातानिं रवाना झाले.

योग्य वेळीं शास्त्रीबुवा गंगामाईच्या पवित्र पाण्याच्या हजारों कावडी घेऊन बोधपुरांत परतले. पुन्हां शुभ मुहूर्त पाहून त्या मुहूर्तावर ती शापित जमीन अक्षरशः गंगामाईच्या पाण्यानं धुऊन काढण्यांत आली.

नंतर शेकडों मजूर कामाला लागले. ठिकठिकाणीं जमीन खोदली गेली.

बऱ्याच परिश्रमानंतर श्रीमंतांनीं दिवाणजींना विचारलं, 'दिवाणजी, कांहीं उपयोग झाला का?'

'छे! निदान शंभर ठिकाणीं तरी खोदण्यांत आलं, पण सोन्याचं नांव नाहीं.'

'बंद करा तो खटाटोप. गंगाधरशास्त्र्यांचं उत्तर चूक आहे. गंगामाईच्या पाण्यापेक्षां जरूर कांहींतरी पवित्र आहे.'

दुसऱ्या दिवशीं वरुणशास्त्र्यांना आमंत्रण गेलं. वरुणशास्त्री श्रीमंतांच्या समोर हजर झाले.

'काय आज्ञा आहे, श्रीमंत?' त्यांनीं नमस्कार करून विचारलं.

'कांहीं दिवसांपूर्वीं आम्हीं सर्व विद्वानांची सभा बोलावली होती. आठवते तुम्हांला?'

होय 'श्रीमंत.'

'त्या वेळीं तुम्हीं म्हणालां होतां, गंगामाईच्या पाण्यापेक्षां या जगांत पर्जन्याचं पाणी पवित्र आहे म्हणून. अजूनहि तुमचं तें मत कायम आहे का?'

'होय, श्रीमंत. अजूनहि मी तसंच म्हणतों.'

'आम्हांला त्याची प्रचीति पाहावयाची आहे.'

'गंगाधरशास्त्र्यांचें उत्तर चूक होतं असं सिद्ध झालं आहे ना श्रीमंत?'

'होय. तें उत्तर चूक होतं असं आम्हांला वाटतं. म्हणून आतां आम्हांला तुमच्या उत्तराची प्रचीति पाहावयाची आहे.'

असं म्हणून श्रीमंतांनीं आपल्या साक्षात्काराची हकीकत वरुणशास्त्र्यांना सांगितली. नंतर श्रीमंतांनीं त्यांना पुन्हां प्रश्न केला, 'अजून तुम्हांला तुमचं उत्तर बरोबर आहे असं म्हणावयाचं आहे का?'

'होय, श्रीमंत.'

'मग असं पाहा. ती जमीन आज वर्षांनुवर्षें पर्जन्याच्या पावसानं धुऊन निघत आहे. असं असतांना ती जमीन अशी कां असावी?'

'त्याचं कारण असं आहे, श्रीमंत. आपण ती जमीन प्रत्यक्ष पाहिली आहे ना? त्या जमिनींत असंख्य ठिकाणचं पाणी वाहून येतं. कमींत कमी चार अपवित्र नाले त्यांत आपल्या अपवित्र पाण्याचा वर्षाव करतात. आणि त्या जमिनीवर पडणारं पर्जन्याचं पाणी तेथेंच न मुरतां बाहेर वाहून जातं.

'मग त्याला काय उपाय, शास्त्रीबुवा?'

'त्याला उपाय एकच आहे. सर्व जमिनीभोंवतीं बांध घालावा लागेल. त्यांत वाहून येणारे सर्व नाले त्या जमिनीबाहेर अडवून त्यांना इतर मार्गानें बाजूला काढून लावावें लागेल व त्या जमिनींत पडणारें सर्व पाणी त्याच ठिकाणीं मुरेल असं करावं लागेल.'

'मग तुमच्या देखरेखीखालीं सर्व काम होऊं द्या. पैशाकडे पाहूं नका. दिवाणजीकडून तुम्हांला लागेल तेवढा पैसा मागून घ्या.'

वरुणशास्त्री श्रीमंतांची रजा घेऊन निघाले. त्यांनीं गंगाधरशास्त्र्यांना हिणवायला कमी केलं नाहीं. बिचारे गंगाधरशास्त्री गप्प बसले. प्रत्यक्ष साक्षात्कारानं त्यांचं उत्तर खोटं ठरवलं होतं.

वरुणशास्त्र्यांनीं स्वतःच्या देखरेखीखालीं कामाला सुरवात केली. शेताच्या चारहि बाजूंना हात हात उंच बांध घातले गेले. शेतांत वाहात येणारे नाले शेताच्या बांधाजवळ अडवून शेताच्या बाजूनें चर खणून त्यांना बाजूला काढून लावण्यांत आलं. सर्व सांगता पूर्ण

झाली. वरुण राजानं ती जागा भिजवून दिली. शेतावर पडलेलं सर्व पाणी शेतांत मुरलं. बाहेरचं अपवित्र पाणी शेतांत घुसलं नाहीं.

वरुणशास्त्र्यांची नक्की खात्री झाली कीं त्या जमिनींतून आतां सोनं निघणार. आपल्यामुळंच या सोन्याचा लाभ श्रीमंतांना होणार असल्यामुळं आपलीहि संभावना श्रीमंत चांगल्या रीतीनं करणार या सुखस्वप्नांत ते दंग होते.

सर्व विधि झाले. ठिकठिकाणीं जमीन खोदली गेली. मजूर श्रमले. पण छे! सोन्याचा कण पण निघाला नाहीं कोठून.

श्रीमंत हताश झाले! हें पण उत्तर चूक! मग काय सर्व जगांत मानवी रक्त पवित्र आहे?—कीं कविराज म्हणतात तसे अश्रू त्यांच्या मनाला दोन्ही उत्तरें नीटशीं पटत नव्हतीं मग आपल्याला साक्षात्कार कसा झाला? एक तरी उत्तर बरोबर असलंच पाहिजे! ते आतां हट्टाला पेटले होते. दोन परीक्षा झाल्या. उरलेल्या दोन्ही परीक्षा त्यांनीं पाहण्याचा निश्चय केला. पहिल्यानं त्यांनीं 'मानवी रक्ताची' प्रचीति पहावयाचें ठरवलें. जर साक्षात्काराप्रमाणं पवित्र पाणी शापित भूमीला मिळालं तर सोनंच सोनं!

त्यांनीं शूरसेनाला आमंत्रण धाडलं. शूरसेन श्रीमंतांच्या समोर हजर झाला.

'काय हुकूम आहे श्रीमंतांचा?'

'मला तुमच्या उत्तराची प्रचीति पाहावयाची आहे.'

'जरूर पहावी श्रीमंत. माझं उत्तर कधीं खोटं पडणार नाहीं.'

'काळच त्याचं उत्तर देईल. जा तुम्ही कामाला लागा.'

'पण श्रीमंत, त्याकरतां मला यवनांच्या धर्मगुरूचं साहाय्य घ्यावं लागेल!'

‘ तें कशाला ? ’

‘ ती जमीन धर्माकरतां सांडलेल्या रक्तानं धुऊन निघाली पाहिजे. मी आपल्या लोकांना तयार करतों. यवनांचा धर्मगुरु त्याच्या लोकांना तयार करील आणि दोन्ही पक्षांचे धर्मवेडे त्या ठिकाणीं आपल्या धर्माकरतां त्या जमिनीवर एकमेकांना कंठस्नान घालतील. ’

‘ पण शूरसेन, यवनांचे धर्मगुरु कसे संमति देतील तुमच्या या बेताला ? ’

‘ श्रीमंत, या जगांत पैसा वाटेल ती गोष्ट करूं शकतो. ’

‘ तुम्ही वाटेल तें करा. त्याच्याशीं आम्हांला कांहीं कर्तव्य नाहीं. आम्हांला आमचं काम झालं पाहिजे. ’

‘त्याबद्दल आपण काळजी करूं नये. सर्व कांहीं मी करून घेतों.’

शूरसेन आपल्या कामाला लागला. यवनांच्या धर्मगुरूकडे त्यांनीं दोन खेपा केल्या. दुसऱ्या खेपेला भली मोठी जड थैली शूरसेन तेथें ठेवून आला.

त्यानंतर त्या शापित भूमीवर शूरसेन यानें ‘ आमच्या धर्माची सर्वश्रेष्ठता ’ या विषयावर प्रवचनें करावयास सुरुवात केली. दिवसें-दिवस त्याची भाषा कडक होऊं लागली. एक दिवस तो त्वेषानं म्हणाला. ‘ मी असं ऐकतों कीं यवनांना माझीं भाषणं पसंत पडत नाहींत. ते तरवारीनं मला उत्तरं देण्याची भाषा बोलत आहेत. त्यांना मी असं सांगतों कीं आमच्या तरवारी गंजल्या नाहींत. तर-वारीला तरवारीनंच उत्तर मिळेल. यापुढं आपणहि आपल्या तरवारी तयार ठेवूनच येथं आलं पाहिजे. कदाचित् त्यांना जर आपल्या तरवारीला तरवार भिडविण्याची इच्छा असेल तर या उद्यांच. काय तें होऊं द्या. ’

दुसरे दिवशीं खरोखरच तेथें तरवारीला तरवार भिडली. कित्येक माणसांचे बळी पडले. ती जमीन धर्माकरतां रक्त सांडणाऱ्या दोन्ही पक्षांच्या रक्तानं न्हाऊन निघाली.

रक्तानं जमीन न्हाऊन निघाली—पण त्यांतून सोन्याचा कण देखील निघाला नाहीं.

आतां एकच उत्तर बाकी होतं—अश्रू ! कविराज आपल्या यशाबद्दल जवळ जवळ खात्री बाळगून होते. तीन उत्तरं चूक ठरलीं होतीं, त्यामुळं त्यांना शंका बाळगायला कारण राहिलं नव्हतं.

कविराज खरे जातिवंत कवि होते. त्यांनीं तेथं मोठा सभामंडप उभारला. लांबलांबून जातिवंत नट आणवले. करुणरसानं ओथंबलेले नाट्यप्रसंग तेथ होऊं लागले. करुणरसानं ओथंबून जाणारी काव्यगंगा तेथं दुथडीं भरून वाहूं लागली. असे नाट्यसमारंभ बरेच दिवस तेथें चालले होते. भावनाप्रधान लोक तेथें ते नाट्यप्रसंग पाहून घळघळा रडत. कठोर हृदयहि पाझरून जावं असे प्रसंग पाहून स्त्रिया तर भान हरपून घळघळा अश्रू गाळीत. शेवटीं त्यांच्या कल्पनेप्रमाणं ती जमीन ‘ पवित्र अश्रूंनीं ’ न्हाऊन निघाली.

एवढं झालं तरी त्या जमिनींतून सोनं निघालं नाहीं !

गंगाधरशास्त्री हरले, वरुणशास्त्री हरले, शूरसेनांनीं हात टेकले, कविराजांच्या कविकल्पनेचं हसं झालं !

साक्षात्कारानं सर्वांचीं उत्तरें चूक ठरविलीं होतीं !

परंतु सर्वांचीं उत्तरं चूक असं जेव्हां साक्षात्कार ठरवूं लागला तेव्हां सर्व विद्वानांनीं जाहीर केलं कीं साक्षात्कार खोटा आहे. जर साक्षात्कार खरा असता तर एक तरी उत्तर खरं ठरलं असतं. सर्वांचीं

उत्तर चूक ठरविणारा साक्षात्कार जेव्हां सर्व विद्वानांनीं चूक ठरविला तेव्हां सारे विद्वान् पुन्हां उजळ माथ्यानं 'आपलंच उत्तर बरोबर आहे' असं जोरजोरानं प्रतिपादूं लागले.

पुन्हां कित्येक वर्षं ती जमीन पडित राहिली. एके दिवशीं सकाळीं एक अतिशय गरीब आणि थकलेला शेतकरी श्रीमंतांची भेट घेण्याकरितां आला. अशा माणसांना कोठली सहजासहजीं श्रीमंतांची भेट घेतां येणार ? तो तासन् तास वाड्याच्या दाराशीं धरणें धरून बसला. त्याला कोणी आंत सोडीना. शेवटीं त्याला श्रीमंतांच्या समोर नेणं भाग पडलं. कारण त्यांनीं पहारेकऱ्यांना सांगितलं कीं, 'मी जीव जाईपर्यंत असा या दाराशीं धरणं धरून बसेन.' शेवटीं पहारेकऱ्यांचा नाइलाजच झाला.

श्रीमंतांच्या समोर जातांच त्यानं धरणीवर साष्टांग नमस्कार घातला.

'काय इच्छा आहे तुझी ?' श्रीमंतांनीं त्याला विचारलं.

'श्रीमंत, मी फार दूरचा शेतकरी आहें. माझी माझ्या गांवाला खूप शेती होती. ती सर्व नदीच्या कांठाला असून खूप सुपीक होती. या वर्षी परमेश्वराचा कोप झाला. नदीला महापूर आला. कित्येक पिढ्यांनीं पाहिला नसेल असा तो पूर होता. नेहमींची सीमा ओलांडून नदी मैलभर आंत घुसली आणि माझी सर्व जमीन त्या महापुरांत धुतली गेली. खडकांनीं आपलीं काळीं तोंडं बाहेर काढलीं. रेतीनं माझी जमीन भरून गेली. मी भिकारी झालों. देशोधडीला लागलों आहें. फिरत फिरत बोधपुरांत आलों. येथें येतांना वाटेंत मला एक मोठी जमीन दिसली. ती पडित आहे. त्या जमिनीवर आपली मालकी असल्याचं कळलं. म्हणून आपल्या पायांशीं आलों आहें. ती जमीन आज कित्येक वर्षं पडित आहे

असं ऐकलं आहे. नाहीं तरी ती फुकट पडली आहे. माझ्यावर दया करा. ती जमीन मला कसायला द्या. मी फुकट मागत नाहीं. पीक निघाल्यावर आपला हिस्सा न मागतां आपल्या पायांशीं आणून ओतीन. श्रीमंत, एवढी भीक आपण या गरीब शेतकऱ्याला घालाच.'

श्रीमंतांना वाटलं, काय वेडा आहे हा माणूस ! आम्हीं एवढा पाण्यासारखा पैसा खर्च केला आणि हात टेकले. वर्षांनुवर्षं गेलीं पण जमिनींत गवत नाहीं उगवलं. पण त्यांनीं विचार केला कीं नाहीं तरी जमीन पडलीच आहे पडित; म्हणून आपल्याला त्याचा उपयोग नाहीं; मग द्यायला काय हरकत आहे ? उपकार केल्या-सारखेंहि होणार आहे.

श्रीमंत त्या शेतकऱ्याला म्हणाले, ' हें पहा, तुझी हकीकत ऐकून आम्हांला तुझी दया आली आहे. ती जमीन कसायला देण्याची आज्ञा आम्ही दिवाणजींना देतों. तूं मुळींच काळजी करूं नको. तुझ्यासारख्या देवाची अवकृपा झालेल्या माणसावर नाहीं दया करायची तर कोणावर ? '

' श्रीमंत किती थोर आपलं अंतःकरण ! माझी गरिबाची आपणांला दया आली. देव आपलं सदा भलं करील. ' असं म्हणत त्या पांथस्थानें श्रीमंतांना साष्टांग नमस्कार घातला.

त्यानंतर त्या जमिनींत तो गरीब शेतकरी, त्याचा तरुण मुलगा आणि त्या तरुण मुलाची आई त्या शेतांत रात्रंदिवस राबतांना दिसूं लागली. त्यांच्याजवळ बैल नव्हते—परंतु ते दोन पुरुष नांगर ओढीत असत आणि ती स्त्री त्यांना हरप्रकारें मदत करीत होती. त्यांनीं दिवस पाहिला नाहीं, रात्र पाहिली नाहीं. थंडी, वारा, ऊन सारखं मानलं ! ते सदासर्वकाल त्या जमिनींत राबत राहिले.




जवळपासच्या लोकांनीं त्या तिघां जणांना वेड्यांत काढलं होतं. त्यांना ते हंसत—नांवं ठेवीत. ते म्हणत, 'हे वेडे वाळूंतून तेल काढायचा प्रयत्न करीत आहेत. विषारी वृक्षाला अमृताचीं फळें येण्याची वाट पाहात आहेत.'

पण त्या तिघांनीं कोणाकडेहि लक्ष दिलं नाहीं आणि आपल्या कामाकडेहि दुर्लक्ष केलं नाहीं. कांहीं दिवसांनीं लोकांना त्या तिघांचा विसर पडला. त्यांच्याकडे कोणी लक्षहि देईना.

ज्येष्ठ महिना आला. आकाशांत काळे ढग धावूं लागले. मधून मधून विजा त्या काळया ढगाआडून आपल्या लांबच लांब जिभा काढून दाखवूं लागल्या. शेवटीं पावसाच्या सरी पृथ्वीवर धांवत येऊं लागल्या. पृथ्वीनं देखील आपल्याकडे येणाऱ्या नव्या पाहुण्या-च्या स्वागताकरतां आपल्या अंगावरचा धुळीनं मळलेला करडा

शालू टाकून हिरवा शालू अंगावर चढवला. त्या वेळीं श्रीमंतांना आणि गांवांतील लोकांना त्या शापित जमिनीची आणि त्या तीन वेड्यांची आठवण झाली.

त्यांच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं !

त्या जमिनींत हिरवें गार पीक डोलत होतं !

श्रीमंतांनीं त्या पांथस्थाला ताबडतोब बोलावून घेतलं. श्रीमंतांच्या समोर येतांच त्यानं त्यांना नमस्कार केला आणि नम्रपणानं विचारलं, ' कशाला बोलावलं मला ? '

' ही जमीन आज कित्येक वर्षं पडित होती–. त्यांत गवताची काडी देखील उगवलेली कोणीं पाहिली नाहीं. कित्येक दिवसांपूर्वी आम्हांला साक्षात्कार झाला होता कीं ही जमीन जर जगांतल्या अत्यंत पवित्र पाण्यानं धुऊन निघाली तर यांतून सोनं निघेल. आम्हीं सर्व विद्वानांना या साक्षात्काराचा अर्थ विचारला. सर्व विद्वान् पराभूत झाले. आणि तूं अशी जादू तरी काय केलीस ? ती जमीन एकाएकीं शापमुक्त कशी झाली ? '

' श्रीमंत, तें मी तरी काय सांगूं? श्रीमंत, आम्ही तिघें त्या शेतांत रात्रंदिवस राबलों. उन्हातान्हांत राबतांना निघणाऱ्या आमच्या तिघांच्या घामानं ती जमीन धुऊन निघाली आणि त्यांतून हें सोनं निघून डोलतं आहे. '

' खरं आहे तुझं म्हणणं. आतां आम्हांला त्या साक्षात्काराचा अर्थ समजला. या जगांत श्रमाच्या घामासारखं पवित्र कांहीं नाहीं. परंतु ही कल्पना विद्वानांच्या कल्पनासृष्टीच्या बाहेरची आहे. खरा विद्वान् तूं आहेस. आणि त्या विद्वत्तेचं बक्षीस म्हणून आम्हीं ती सर्व जमीन तुला बक्षीस दिली आहे. तूं आनंदानं त्या जमिनीचा उपभोग घे.

90-20
2003

त्या दिवसापासून तो त्या जमिनीचा मालक झाला. आणि ते सर्वजण बोधपुरांत आनंदानें राहूं लागले. आणि त्यानंतर त्या जमिनीचा लहानसा तुकडा देखील लोकांना कधीं पडित दिसला नाहीं.

---

स्वाध्याय:—

(१) श्रीमंतांची पडिक जमीन सुपीक होण्यास देवदूतानें कोणता उपाय सुचविला ? (२) गंगेचें पाणी व रक्त त्या जमिनीला कां उपयोगी पडलें नाहीं ? (३) पडिक जमीन सुपीक होण्यास कोणतें पवित्र पाणी मिळालें ? तें पवित्र कां ?

## संपादक मंडळ

डॉ. ग. श्री. खैर, एम. ए., पीएच्. डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्. ए.
श्री. मु. ल. जोशी, बी. एस्सी., बी. टी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी. ए. (ऑ.) एम्. इडी.
प्रा. शं. वा. चितळे, एम्. ए., बी. टी., विशारद,
कार्यकारी संपादक

विद्वान् सर्वत्र पूज्यते
अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणें.

IRBK-0102993

IRBK-0102993